# ८५० टन कचरा हटवला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

महापालिकेच्यावतीने पूरग्रस्त भागात स्वच्छतेची जोरदार मोहीम दहाव्या दिवशीही राबवण्यात येऊन प्लास्टिक व गाळ असा जवळपास ८५० टन कचरा काढण्यात आला. या मोहिमेत महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसह विविध सेवाभावी संस्थांचे कार्यकर्ते सहभागी झाले .

पंचगंगा तालीम रोड, दुधाळी, जुना बुधवार पेठ, सिध्दार्थनगर, व्हीनस कॉर्नर, शाहूपुरी पहिली ते पाचवी गल्ली, कुंभार गल्ली, लक्ष्मीपुरी, खानविलकर बंगला, कसबा बावडा, न्यू पॅलेस, कमदवाडी, लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, शिंगणापूर रोड, मस्कुती तलाव, पंचगंगा हॉस्पिटलसमोर, बापट कॅम्प, मुक्त सैनिक वसाहत अशा ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. महापालिकेकडे असलेले डंपर, टीपर, ट्रॅक्टर ट्रॉली, जेसीबीच्या माध्यमातून स्वच्छता केल्यानंतर धूर व औषध फवारणी करण्यात आली. तसेच ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली.



पूरग्रस्त भागातील कचरा उठावासाठी एनसीसी, एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी मोठा हातभार लावला.

दिवसभरात या सर्व वाहनांच्या ४११ फेऱ्या करुन कचरा व गाळ जमा करण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेत न्यू कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे ३०, महावीर कॉलेजचे ६० विद्यार्थी सहभागी झाले. महापालिकेचे ५५० सफाई कर्मचारीही मोहिमेत होते. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे ३०० कर्मचारी, नवी मुंबई महानगरपालिकेचे ८० सफाई कर्मचारी, बीव्हीजी कंपनीचे ८५ सफाई कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचाही मोहिमेत समावेश होता. दरम्यान, शहरातील स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्यासाठी सेवाभावी संस्था मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

# जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात मोफत रॉकेल

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

जिल्ह्यातील पूरग्रस्तांना प्रती कुटुंब ५ लिटर रॉकेल मोफत वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी एकूण ३४ टँकर रॉकेल वितरणास मंजुरी दिली आहे. घाऊक वितरकांनी त्वरीत किरकोळ वितरकांना रॉकेल उपलब्ध करून द्यावे. यामध्ये दिरंगाई झाल्यास करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी देसाई यांनी दिला आहे.

कागल, राधानगरी, गडहिंग्लज, आजरा, चंदगड, गगनबावडा, करवीर, भुदरगड, शाहूवाडी, पन्हाळा, करवीर येथे रॉकेल पुरवठा करण्यासाठी दोन ते तीन तालुक्यासाठी एक टँकर मिळेल. शिरोळ तालुक्यासाठी ५ हातकणंगले, इचलकरंजीसाठी ३, कोल्हापूर शहरासाठी ५ टँकर रॉकेल वितरणास मंजुरी मिळाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने उघडलेल्या कोल्हापूर डिझास्टर रिलिफ फंड या खात्यामध्ये मुख्यमंत्री सहायता

## जिल्हाधिकारी दौलत देसाई यांची माहिती

निधीतून ५ कोटी रूपयांचा निधी प्राप्त झाला आहे. या निधीमधून स्वयंसेवी संघटनांतर्फे जे साहित्य पूरग्रस्तांना वितरीत करण्यात येणार आहे, त्याच्या वाहतुकीच्या इंधनावर खर्च करण्यात येणार आहे. याशिवाय मृत जनावरांची विल्हेवाट लावण्यासाठी खर्च करण्यात येणार आहे.

पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी देण्यासाठी कोल्हापूर डिझास्टर रिलिफ फंड या नावाने बँक ऑफ इंडियाच्या शाहूपुरी शाखेत खाते उघडण्यात आले आहे. त्याचा खाते क्रमांक ०९०११०११००१८७३० असा आहे. त्याचबरोबर आयएफएससी कोड बीकेआयडी ००००९०१ असा आहे. दानशूर व्यक्ती, संस्थांनी यावर आर्थिक मदत करावी.

# महापुराच्या आपत्तीत धावल्या 'आपदा सखी'

Appasaheb.mali
@timesgroup.com
Tweet : Appasaheb_MT

कोल्हापूर : या सगळ्या युवती वेगवेगळ्या कॉलेजच्या विद्यार्थिनी आहेत. काही युवती ज्युनिअर कॉलेज तर काहीजणी सिनीअर कॉलेजमध्ये शिकत आहेत. 'पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आम्ही संकटसमयी उभे राहिलो. पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला. एनसीसी कॅडेट म्हणून देशसेवा तसेच समाजसेवेतही आमचा सहभाग राहिला, हा आमच्यासाठी खूप मोठा ठेवा आहे. एनसीसी कॅडेट म्हणून देशसेवा तसेच समाजसेवेतही आमचा सहभाग राहिला, हा आमच्या जीवनातील अनमोल आणि अविस्मरणीय प्रसंग आहेत,' अशा भावना या युवतींनी व्यक्त केल्या.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत मे महिन्यात या युवतींना खास प्रशिक्षण दिले. पंधरा दिवसाच्या शिबिरात आपत्तकालीन स्थितीवर कशा पद्धतीने मात करायची, लोकांना सुरक्षितपणे अन्यत्र कसे पोहचवायचे, प्राथमिक उपचार पद्धती अशा विविध बाबींचे त्यांना प्रशिक्षण दिले. 'आपदा सखी'बनलेल्या सगळ्या मुली या कॉलेज शिक्षण घेणाऱ्या आहेत. कोल्हापुरातील कमला कॉलेज, न्यू कॉलेज, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, महाराष्ट्र हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमधील युवतींचा 'आपदा सखी'मध्ये सहभागी आहे.



"

आपत्तीच्या काळात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून 'आपदा सखीं'नी काम केले. या कालावधीत धीरोदात्तपणे कसे काम करावे याचा अनुभव मिळाला. पूरग्रस्तांना मदत पोहचवू शकलो याचे समाधान आहे.

\- शुभांगी घराळे,
सहभागी विद्यार्थिनी

महापुराच्या आपत्तीत आपदा सखींचा मोठा फायदा झाला. जिल्ह्यात विविध भागात त्या कार्यरत होत्या. त्या बचावकार्यात सक्रिय होत्या. 'आपदा सखी' मध्ये युवतींची संख्या जितकी वाढविता येईल तितकी उपयुक्त ठरणार आहे.

\- प्रसाद संकपाळ,
आपत्ती व्यवस्थापन अधिकारी

**अन्य संस्थांतील युवतीही बचावकार्यात**

- आधार रेस्क्यू फोर्स, इचलकरंजी
- स्वराज्य फाउंडेशन, कागल
- जीवनज्योत व जीवन आधार संस्था
- व्हाइट आर्मीची युवतींची फौज

## युवतींची लष्कर व एनडीआरएफसोबत बचावकार्यात मदत

कमला कॉलेजमधील शुभांगी मधुकर घराळे (एमए), वैष्णवी सुनील कांबळे (बीए प्रथम वर्ष), श्रद्धा कुमार पाटील (बीए द्वितीय वर्ष), अश्विनी अनंत काताळे (बीए द्वितीय वर्ष), निहारिका महादेव राऊत (बीए द्वितीय वर्ष) व प्रिन्सेस पद्माराजे ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी सानिका चंद्रकांत शिंदे ही बारावीत शिकत आहे. तर शामल संजय कांबळे ही न्यू कॉलेजमध्ये बीए करत आहे.

महापुराने जिल्ह्याला विळखा घातल्यानंतर लष्कर व एनडीआरएफच्या जवानांना पाचारण केले. तत्पूर्वीच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत 'आपदा सखी' आंबेवाडी, चिखली भागातील मदत कार्यात सक्रिय होत्या. शहरातील 'आपदा सखीं'नी आंबेवाडी, प्रयाग चिखली, केर्ली, शिरोली, बालिंगा, आंबेवाडी, तावडे हॉटेल, गांधीनगर, दोनवडे फाटा, वन्नूर, सांगली फाटा या भागात प्रत्यक्ष मदत कार्य केले. पूरग्रस्तांना बोटीत बसविणे, सुरक्षितस्थळी पोहचविणे, लहान मुले, महिलांची विशेष काळजी घेत त्यांना पुरातून बाहेर काढणे अशा विविध पातळीवर काम केले. बोटीतून गॅस सिलिंडर पोहचविले.

20 | 8 | 19

Scanned by CamScanner